स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित

म.रा.र.वि.म.
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

मरारविम/प्रशासन/ज.अ./प्रसिध्दीपत्रक/२०२३/३२७८

## प्रसिध्दीपत्रक

### महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा पावसाळी नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार

मुंबई, दि. ३१ मे, २०२३.

मुंबई महानगर प्रदेशातील पावसामुळे उद्भवणारी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने दि. १ जून, २०२३ पासून पावसाळी नियंत्रण कक्ष सुरु करण्यात येणार आहे. सदर नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार असून महामंडळाचे अधिकारी व अभियंता कर्तव्य बजावणार आहेत.

मुंबई महानगर प्रदेशातील महामंडळाच्या अखत्यारितील विविध उड्डाणपुलांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी अभियांत्रिकी विभागाकडे आहे. राज्य (मंत्रालय) व बृहन्मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका इ. आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या बरोबर मरारविम (मर्या.) च्या नियंत्रण कक्षाच्या समन्वय राहील. सदर नियंत्रण कक्ष दि. ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत सुरु राहील.

**नियंत्रण कक्ष दूरध्वनी क्रमांक** : ०२२-२६५१७९३५/ २६४२०९१४

**मोबाईल क्रमांक** : ८९२८१२८४०६

(तुषार अहिरे)
जनसंपर्क अधिकारी
म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.